| | | | |
|---|---|---|---|
| MHST160014102022 | दाखल दिनांक | : | १२.१०.२०२२. |
| | नोंदणी दिनांक | : | १२.१०.२०२२. |
| | निकाल दिनांक | : | २०.०२.२०२५. |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस.<br>०२ ०४ ०८. |

**भाग - अ**

**<u>न्यायदंडधिकारी प्रथम श्रेणी, वाई यांचे न्यायालयात</u>**

तालुका- वाई, जिल्हा- सातारा.

(पिठासिन अधिकारी आर. एम. भेंडे)

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ७१३/२०२२</u>**

**<u>निशाणी क्र.७ पुढे सुरु.</u>**

अपराध क्र.२१३ सन २०२२ दिनांक ०९.०६.२०२२ भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३८ आणि मोटर वाहन कायदा कलम १८४, वाई पोलिस स्टेशन, ता.वाई. जि.सातारा.

| | |
|---|---|
| सरकारपक्ष | **महाराष्ट्र सरकार**<br>पोलिस निरीक्षक<br>वाई पोलिस स्टेशन यांचे मार्फत,<br>ता.वाई, जि.सातारा. |
| प्रतिनिधीत्व | सौ. एस. आर. जाधव, सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | **प्रज्वल रविंद्र भिलारे.**<br>वय - २४ वर्षे, धंदा - शेती.<br>रा. भिलार, तालुका - महाबळेश्वर, जिल्हा - सातारा. |
| प्रतिनिधीत्व | श्री. बी. व्ही. लेंभे आरोपीतर्फे विधीज्ञ. |

**भाग - ब**

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक | ०८.०६.२०२२. |
| प्रथम फिर्याद दिल्याचा दिनांक | ०९.०६.२०२२. |
| दोषारोपाचा दिनांक | १२.१०.२०२२. |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ३०.०८.२०२३. |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०४.०१.२०२४. |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | ....... |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २०.०२.२०२५. |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, जर असेलतर. | ...... |

## आरोपीची माहिती

| आरोपीचा दर्जा | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सुटल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | काय निर्दोष सोडण्यात आले किंवा शिक्षा केली. | शिक्षा किती ठोठावली. | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे सेट ऑफ दिला काय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रज्वल रविंद्र भिलारे | १९.१०.२० २२ रोजी सीआरपीसी ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस | १९.०७.२३ | भा.दं.वि.कलम २७९, ३३८ आणि मो.वा.का. कलम १८४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | लागु नाही. | लागु नाही. |

## **भाग - क**

## सरकारी पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदार

### **अ. सरकार पक्ष**

| **क्रमवारी** | **नांव** | नि.क्र. | **पुराव्याचे स्वरूप** प्रत्यक्ष साक्षीदार/पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार,वैद्यकिय साक्षीदार,पंच साक्षीदार. |
|---|---|---|---|
| १. | सचिन कृष्णा भिलारे | नि.क्र.७ खाली | घटनास्थळ पंच |
| २. | सिध्देश शिवाजी भिलारे | नि.क्र.७ खाली | घटनास्थळ पंच |
| ३. | पुनम नवनाथ भोईटे | नि.क्र.७ खाली | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ४. | दिनकर श्रीरंग यादव | नि.क्र.७ खाली | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ५. | क्षमा दादासाहेब माने | नि.क्र.७ खाली | दाखल अंमलदार |
| ६. | धीरज शिवाजी यादव | नि.क्र.७ खाली | तपासी अधिकारी |

### **ब. बचाव पक्ष**

| **क्रमवारी** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|
| .... | ..... | ..... |

### **क. न्यायालयीन साक्षीदार**

| **क्रमवारी** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|
| --- | ----- | ------ |

## सरकारी पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांनी दिलेल्या निशाण्या

### **अ. सरकार पक्ष**

| **अ.क्र.** | **निशाणी नंबर** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | वाहन पंचनामा | नि.क्र.१० |
| २. | प्रथम खबरी अहवाल | नि.क्र.१६ |
| ३. | जबाब | नि.क्र.१६-अ |
| ४. | मुळ तपास आदेश | नि.क्र.२० |
| ५. | घटनास्थळ पंचनामा | नि.क्र.२१ |

| | | |
|---|---|---|
| ६. | साक्षीदार क्र.३ पुनम व साक्षीदार क्र.४ दिनकर यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ | नि.क्र.२२ व २३ |
| ७. | घटनास्थळाचे फोटो | आर्टीकल ए व बी |

**ब. बचाव पक्ष**

| अ.क्र. | निशाणी नंबर | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१७ | खबरी जबाबामधील मजकुर "patient is conscious, oriented at present 09.06.2022 at 03.00 p.m. |

**क. न्यायालयीन निशाणी**

| अ.क्र. | निशाणी नंबर | वर्णन |
|---|---|---|
| ... | ... | ... |

**ड. भौतिक आक्षेप**

| अ.क्र. | भौतिक आक्षेप क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ... | ... | ... |

**न्यायनिर्णय**

(पारित व घोषित दिनांक २०.०२.२०२५)

सदरचा खटला हा आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाच्या कलम २७९, ३३८ तसेच मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये दंडनीय अपराधाकरीता चालविणेत येत आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे -**

**२.** फिर्यादी शेषराव काशीनाथ जाधव यांनी अशी फिर्याद दिली की, दि.०८.०६.२०२२ रोजी ते त्यांची कार क्र.एमएच-१२-आरएफ-१३८२ या वाहनाने सकाळी ०९.०० वाजताचे सुमारास वाई एमआयडीसी येथे कामावर गेले होते. त्यानंतर ते काम आटोपुन सायंकाळी ०७.०० वाजताचे सुमारास सदरील कारमधुन घरी जात असताना त्यांनी त्यांचे वाहन बावधन नाका येथे पाचगणी पाचवड जाणारे लेनवर रोडचे बाजुला उभे केले व एका बेकरीमध्ये पाण्याची बॉटल विकत घेण्यासाठी गेले. त्यानंतर ते पाणी घेवुन कारचे दिशेने पायी चालत जात असताना पाचगणी ते पाचवड जाणारी लेन क्रॉस करीत असताना पाचगणी बाजुकडुन एक मोटारसायकल चालक त्या दिशेने आला व त्यांना येवुन धडकला. त्यावेळी सायंकाळचे ०७.३० वाजले होते. त्यामुळे ते खाली पडल्याने त्यांच्या दोन्ही पायाला फ्रॅक्चर झाले होते. त्यानंतर त्यांना धडक देणा-या मोटारसायकल चालकाने व तेथे जमलेल्या लोकांनी वाई येथील मिशन हॉस्पीटल येथे उपचाराकरीता दाखल केले. त्यावेळी ती हिरो होंडा सीडी १०० एसएस ही मोटारसायकल क्र.एमएच-१४-झेड-१०८३ आरोपी प्रज्वल भिलारे चालवित होता. सबब, फिर्यादीने वाई पोलीस ठाण्यात आरोपीविरूध्द तक्रार नोंदविली.

३. प्रस्तुत फिर्याद वरून पोलिस ठाणे वाई येथे अपराध क्रमांक २१३/२०२२ या गुन्ह्याची नोंद करण्यात आली. गुन्ह्याचे तपासकाम पोलीस नाईक श्री. धीरज शिवाजी यादव ब.नं.१८२९ यांच्याकडे सुपुर्द करण्यात आले. त्यांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला, घटनास्थळाचे फोटो काढले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले, साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली आणि तपासाअंती न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. मी भारतीय दंड विधान कलम २७९, ३३८ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये नि.क्र.७ वर आरोपीचे प्रतिकथन नोंदविले. तथापि, आरोपीने ते नाकबूल केले व संपरिक्षणाची विनंती केली. तदनंतर, अभियोग पक्षाने प्रस्तुतच्या प्रकरणात एकूण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली आहे. अभियोग पक्षाचा पुरावा संपल्यानंतर आरोपीविरूध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वयेचे बयान नि.क्र.७ वर नोंदविले. त्यामध्ये आरोपीने त्यास खोट्या गुन्ह्यामध्ये गोवण्यात आल्याचा बचाव घेतला.

५. अभिलेखावर उपलब्ध पुरावा व दोन्ही पक्षाच्या युक्तीवादावरून खालील वादप्रश्न माझ्या समोर उपस्थित झाले आणि त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.नं.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दि.०८.०६.२०२२ रोजी सायंकाळी १९.३० वाजणेचे सुमारास मौजे वाई, तालुका वाई गावचे हद्दीत बावधन नाका येथे पाचगणी ते पाचवड जाणारे रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्रमांक एमएच-१४-झेड-१०८३ हे वाहन निष्काळजीपणे किंवा बेदरकारपणे, हयगयीने अविचाराने चालवून मानवी जिवीतास व इतरांच्या सुरक्षेस धोका उत्पन्न होईल अशा रितीने चालवून फिर्यादीस धडक दिली व अपघात केला ? ..... | नाही. |
| २. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे वर नमूद वाहन हयगयीने किंवा निष्काळजीपणे चालवून अपघात करुन फिर्यादीचे गंभीर दुखापतीस तो कारणीभूत ठरला ? ..... | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे वर नमूद वाहन निष्काळजीपणे तसेच रस्त्यावरील रहदारीचा अंदाज न घेता बेदरकारपणे चालविले ?..... | नाही. |
| ४. | आदेश काय ? ..... | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

### वादप्रश्न क्र.१ ते ३ करीताः

६. सदर सर्व वादप्रश्न एकमेकांशी निगडीत असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांना एकत्रीत विचारात घेतले आहे. आरोपीविरूध्द असलेले दोषारोप सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने असे शाबीत करणे आवश्यक आहे की, कथीत घटनेच्यावेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे किंवा बेदरकारपणे, हयगयीने, अविचाराने तसेच रस्त्याच्या रहदारीचा अंदाज न घेता चालविले आणि फिर्यादीस धडक देवुन अपघात करून फिर्यादीचे गंभीर दुखापतीस आरोपी कारणीभुत ठरला.

७. पंच साक्षीदार क्र.१ सचिन भिलारे यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितले की, दि.०९.०६.२०२२ रोजी कथीत घटनास्थळी पंचनामा करीत असताना त्यांना व सिध्दार्थ शिवाजी भिलारे यांना तेथे पोलीसांनी बोलाविले होते. बावधन नाक्याजवळ वाई पाचवड रस्त्यावर अपघात झाल्याचे त्यांना पोलीसांनी सांगितले होते. त्यांना पोलीसांनी व आरोपीने घटनास्थळ दाखविले होते. अपघातस्थळ हे डिवायडरच्या दहा ते पंधरा फुट अंतरावर रस्त्याच्या मध्यभागी होते. पोलीसांनी तेथे आर्टीकल ए व बी वरील फोटो काढले. त्यानंतर त्या पंचनाम्यावर त्यांच्या सहया पोलीस ठाण्यात घेण्यात आल्या. पोलीस घटनास्थळी काय लिहित होते याबाबत त्यांना माहिती नसल्याचे ते सांगतात. तसेच घटनास्थळ पंचनाम्यावर त्यांची अ.क्र.१ वर सही आहे, परंतु त्यातील मजकुर बरोबर नाही. पोलीसांनी पोलीस ठाण्यात लाल रंगाच्या होंडा कंपनीची दुचाकी क्र.१०८३ चा केलेला वाहन पंचनामा नि.क्र.१० वर आहे. सदरील साक्षीदाराने सरकार पक्षाच्या कथनास सहाय केले नसल्याने त्यास सहायक सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासाच्या स्वरूपात काही प्रश्न विचारले. तथापि, त्यामध्ये आरोपी प्रज्वल भिलारे हा त्यांच्या गावचा रहिवाशी असल्याची कबूली वगळता सरकार पक्षास उपयुक्त ठरु शकेल अशी इतर कोणतीही महत्वाची बाब आलेली नाही.

८. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी कथीत अपघातस्थळी झेब्रा क्रॉसींग अथवा सिग्नल नसल्याचे मान्य केले आहे. तसेच त्या रस्त्यावर नेहमीच वाहनांची वर्दळ असते. कथीत अपघात नेमका कोणत्या स्थळी झाला हे त्यांना सांगितले नव्हते. पुढे त्यांनी कथीत घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुराबाबत व मोजमापाबाबत कोणतीही शहानिशा केली नसल्याचे व तयार पंचनाम्यावर केवळ सही केल्याचे मान्य केले आहे. तसेच त्यांनी कथीत वाहन पंचनाम्याच्यावेळी कथीत वाहनाची कोणतीही पाहणी केली नव्हती व त्या पंचनाम्यावर केवळ सही केल्याचे सांगितले आहे.

९. साक्षीदार क्र.२ सिध्देश भिलारे यांनी देखील त्यांच्या साक्षीत घटनास्थळ पंचनाम्यावर त्यांची केवळ सही असुन त्यातील मजकुर माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदरील साक्षीदाराने सरकार पक्षाच्या कथनास समर्थन केले नसल्याने सहायक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलटतपासाच्या स्वरूपात काही प्रश्न विचारले. त्यामध्ये सदरील साक्षीदाराने आरोपी प्रज्वल हा त्याच्या गावचा रहिवाशी असल्याचे मान्य केले आहे. तसेच आरोपीने अपघातस्थळ दाखविले होते असेही तो मान्य करतो. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी कथीत घटनास्थळी वाहनांची सतत वर्दळ असल्याचे व त्या ठिकाणी कोणतेही झेब्रा क्रॉसींग अथवा सिग्नल नसल्याचे मान्य केले आहे.

१०. साक्षीदार क्र.३ पुनम नवनाथ भोईटे व साक्षीदार क्र.४ दिनकर श्रीरंग यादव यांनी त्यांच्या साक्षीत दि.०८.०६.२०२२ रोजी संध्याकाळी त्या ठिकाणी काय घटना घडली होती हे त्यांना आठवत नसल्याचे सांगितले आहे. तसेच ते आरोपी प्रज्वल भिलारे व फिर्यादी शेषराव काशीनाथ जाधव यांना देखील ओळखत नाहीत. साक्षीदार क्र.४ दिनकर अपघात प्रत्यक्ष पाहिला नसल्याचे सांगतात. तसेच त्या अपघातास कोण जबाबदार होते हे देखील त्यांना सांगता येत नसल्याचे कथन करतात. सदरील साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनास सहाय केले नसल्याने त्यांना सहायक सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासाच्या स्वरूपात प्रश्न विचारले. त्यामध्ये त्यांना त्यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचुन दाखविले असता त्यांनी तसे पोलीसांना सांगितले नसल्याचे कथन केले आहे.

११. साक्षीदार क्र.५ क्षमा दादासाहेब माने यांनी असे सांगितले की, दि.०९.०६.२०२२ रोजी त्यांनी सदरचा गुन्हा दि.०८.०६.२०२२ रोजीच्या एमएलसी मधील

जबाबावरून नोंदविला होता. तो फिर्यादी शेषराव काशीनाथ जाधव यांचा जबाब राखीव पोलीस ठाणे अंमलदार श्री. डी.एस.यादव यांनी नोंदविला होता. प्रथम खबरी अहवाल नि.क्र.१६ वर असुन त्यावर त्यांची सही आहे व त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यांनी आरोपीला पाहिले नसल्याचे कथन केले आहे. उलटतपासणी दरम्यान सदरील साक्षीदाराने दि.०९.०६.२०२२ रोजी फिर्यादी हा मिशन हॉस्पीटलमध्ये दाखल असल्याचे मान्य केले आहे. एमएलसी वर फिर्यादी हा जबाब देण्यास सक्षम नसल्याबाबत शेरा असल्याचे त्या सांगु शकत नाहीत कारण त्यांनी एमएलसी पाहिली नव्हती. खबरी जबाबामधील patient is conscious, oriented at present 09.06.2022 at 03.00 p.m. अशा नि.क्र.१७ वरील मजकुराबाबत त्यांना वैयक्तीकरीत्या माहिती नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

**१२.** तपासी अधिकारी साक्षीदार क्र.६ धीरज शिवाजी यादव (पोलीस हवालदार) यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, त्यांना दि.०९.०६.२०२२ रोजी फिर्यादीच्या आदल्या दिवसाच्या अपघाताची एमएलसी मिशन हॉस्पीटल, वाई येथुन प्राप्त झाली होती. त्याप्रमाणे त्यांनी मिशन हॉस्पीटल, वाई येथे जावुन जखमी शेषराव जाधव यांचा जबाब तेथील डॉक्टरांच्या समक्ष नोंदविला होता. त्याप्रमाणे फिर्यादीने त्यांना त्याच्या अपघाताबाबत माहिती दिली होती व त्यांनी तो जबाब नि.क्र.१६-अ प्रमाणे नोंदविला होता. त्यांना सदरील गुन्हयाचा देण्यात आलेला मुळ तपास आदेश नि.क्र.२० वर आहे. त्यावर ठाणे अंमलदार म.पो.हवा. श्रीमती माने यांची सही आहे. तपासा दरम्यान सर्वप्रथम त्यांनी दोन पंचांसमक्ष घटनास्थळी जावुन नि.क्र.२१ वरील घटनास्थळ पंचनाम्याची कार्यवाही केली. घटनास्थळ हे पाचगणी ते पाचवड रस्त्यावर रस्ता दुभाजकाजवळ होते. त्या दरम्यान त्यांनी आर्टीकल ए व बी वरील फोटो काढले होते. तसेच त्यांनी नि.क्र.१० वरील दुचाकीचा वाहन पंचनामा पंचांसमक्ष केला होता. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्यानुसार बरोबर नोंदविले होते. साक्षीदार क्र.३ पुनम व साक्षीदार क्र.४ दिनकर यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग - अ अनुक्रमे नि.क्र.२२ व २३ वर असुन तो त्यांनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता. त्यानंतर त्यांनी जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले होते व अपघातग्रस्त वाहन आरोपीला परत दिले होते, तसेच आरोपीस मोटार वाहन कायदा कलम २०९ प्रमाणे नोटीस दिली व तपासाअंती त्यांनी आरोपी विरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**१३.** बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान सदरील साक्षीदाराने असे मान्य केले की, कथीत अपघातस्थळी कोणतीही सिग्नल यंत्रणा कार्यरत नव्हती व त्या ठिकाणी पादचा-यांकरीता वेगळी व्यवस्था नाही. तसेच कुठल्याही पादचा-यांनी रस्ता ओलांडताना रस्त्याच्या दोन्ही बाजुने येणा-या वाहनांबाबत खात्री करणे आवश्यक असते व फिर्यादीने त्यांना कथीत अपघाताच्यावेळी त्याने रस्त्याच्या दोन्ही बाजुने येणा-या वाहनांबाबत खात्री केली होती किंवा कसे याबाबत सांगितले नसल्याचे कथन केले आहे. त्याचप्रमाणे फिर्यादीने त्यांना कथीत अपघाताच्यावेळी नेमका किती रस्ता ओलांडला होता व किती शिल्लक होता याबाबत देखील जबाब देतेवेळी सांगितले नव्हते असे त्यांनी सांगीतले. उर्वरीत उलटतपास हा नकारार्थी स्वरूपाचा आहे.

**१४.** अशाप्रकारे, अभियोग पक्षातर्फे आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द होण्याकामी पुरावा सादर करण्यात आला आहे. उपलब्ध पुराव्याचे सूक्ष्म अवलोकन करता जरी प्रथमदर्शनी कथीत घटनेच्या दिवशी फिर्यादीचा अपघात झाल्याचे व त्यास जखमा झाल्याचे दिसुन येत असले तरी त्या अपघातास आरोपीचा निष्काळजीपणा अथवा बेदरकारपणा कारणीभुत होता किंवा कसे हे बघणे महत्वाचे आहे.

**१५.** पंच साक्षीदार क्र.१ सचिन यांनी त्यांच्या सरतपासात घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर बरोबर नसल्याचे कथन केले आहे. तसेच पोलीस घटनास्थळी काय लिहित होते या बाबत देखील त्यांना माहिती नसल्याचे ते सांगतात. पंचनाम्यातील मजकुराबाबत व मोजमापाबाबत कोणतीही शहानिशा केली नसल्याचे व तयार पंचनाम्यावर केवळ सही केल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तसेच त्यांनी कथीत वाहन पंचनाम्याच्यावेळी कथीत वाहनाची कोणतीही पाहणी केली नव्हती व त्या पंचनाम्यावर केवळ सही केल्याचे सांगितले आहे. दुसरे पंच साक्षीदार क्र. २ सिध्देश यांनी जरी त्यांना पोलीसांनी घटनास्थळ पंचनाम्याचेवेळी अपघातस्थळी बोलाविले असल्याचे सांगीतले असले तरी सदरील पंचनाम्यावर त्यांची केवळ सही असुन त्यातील मजकुर माहिती नसल्याचे कथन त्यांनी केले आहे. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलटतपासाच्या स्वरूपात विचारलेल्या प्रश्नाचे उत्तरात त्यांनी स्पष्टपणे नाकारले की, पोलीसांनी नकाशा काढून पंचनामा कार्यवाही केली, त्यातील मजकूर त्यांना वाचून दाखविला आणि तो बरोबर असल्याने त्यांनी त्यावर सही केली. अशा परिस्थीतीत, सदरील पंचनामा व

त्यात नमुद असलेला मजकूर अभियोग पक्षाने निसंदिग्धपणे शाबीत केला असे म्हणता येणार नाही.

**१६.** साक्षीदार क्र.३ पुनम व साक्षीदार क्र.४ दिनकर हे सरकार पक्षाच्या कथनानुसार सदरील अपघाताचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. तथापि, त्यांनी देखील सरकार पक्षाच्या कथनास सहकार्य केले नाही. आरोपीने भरधाव वेगात त्याचे वाहन चालविल्यामुळे कथीत अपघात झाल्याची बाब त्यांना आठवत नाही असे ते सांगत असल्याने त्यांच्या साक्षीवर विसंबून राहून आरोपीविरुध्द कोणताही निष्कर्ष काढता येणार नाही.

**१७.** साक्षीदार क्र.५ क्षमा माने (महिला पोलीस हवालदार) यांनी फिर्यादीच्या खबरी जबाबावरुन केवळ गुन्हा नोंदविलेला आहे. त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही महत्वाची भुमीका त्यांनी पार पाडलेली नाही. उलटतपासात त्यांनी नि.क्र.१७ मधील मजकुराबाबत वैयक्तीकरीत्या माहिती नसल्याचे मान्य केले आहे. तपासी अधिकारी साक्षीदार क्र. ६ श्री. यादव यांनी देखील बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान काही महत्वाच्या प्रश्नांना कबुली दिली आहे. त्यामध्ये कथीत अपघातस्थळी कोणतीही सिग्नल यंत्रणा कार्यरत नव्हती व पादचा-यांकरीता वेगळी व्यवस्था नाही, तसेच कुठल्याही पादचा-यांनी रस्ता ओलांडताना रस्त्याच्या दोन्ही बाजुने येणा-या वाहनांबाबत खात्री करणे आवश्यक असते व फिर्यादीने त्यांना कथीत अपघाताच्यावेळी त्याने रस्त्याच्या दोन्ही बाजुने येणा-या वाहनांबाबत खात्री केली होती किंवा कसे याबाबत त्यांना सांगितले नसल्याचे कथन केले आहे. पंच साक्षीदारांनी देखील अपघाताच्या ठिकाणी पादचा-यांकरीता कोणतेही झेब्रा क्रॉसींग नव्हते असे स्पष्ट सांगीतले आहे. त्यामुळे कथीत अपघातास आरोपीचा निष्काळजीपणा किंवा बेदरकारपणा कारणीभूत होता असा निष्कर्ष काढणे न्यायोचित ठरणार नाही.

**१८.** फिर्यादी यांना नि.क्र.११ व २४ ते २९ वर वेळोवेळी साक्षी समन्स व जामीनपात्र वॉरंट काढण्यात आले. परंतु अभियोग पक्ष त्यांची उपस्थिती साध्य करुन साक्ष नोंदविण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे प्रत्यक्षात फिर्याद मधील मजकूर निसंशयपणे शाबीत झालेला नाही. एकूणच उपलब्ध पुराव्यावरुन आरोपीस दोषी ठरविता येणार नाही. त्यामुळे सदर अपघातास आरोपीचा निष्काळजीपणा, बेदरकारपणा तसेच हयगयीपणा कारणीभुत ठरला आणि त्याने रस्त्यावरील रहदारीचा अंदाज न घेता त्याचे वाहन चालविले तसेच फिर्यादीच्या गंभीर जखमांना

तो त्याव्दारे जबाबदार होता या संपूर्ण बाबी वाजवी संशयापलीकडे जावुन सिध्द होत नाही. अशाप्रकारे, अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द असलेले दोषारोप वाजवी संशया पलीकडे जावून सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे भा.दं.वि.कलम २७९, ३३८ तसेच मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वयेच्या महत्वपूर्ण घटकांची पूर्तता झालेली नाही. करीता, वादप्रश्न क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत.

**<u>वादप्रश्न क्र.४ करीता</u>** -

**१९.** वादप्रश्न क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्यामूळे आरोपीची दोषारोपातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित ठरेल. करीता, वादप्रश्न क्र.४ च्या निष्कर्षाकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **प्रज्वल रविंद्र भिलारे** यांस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) मधील तरतुदींनुसार भारतीय दंड विधानाच्या कलम २७९, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वयेच्या दंडनिय अपराधाच्या दोषारोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक व जामीन बंधपत्र याद्वारे रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ मधील तरतुदीनुसार रक्कम रु. १५,०००/- चे वैयक्तिक व जामीन बंधपत्र पुढील सात दिवसाच्या आत सादर करावे.

*<u>न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उदघोषित करण्यात आला.</u>*

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.02.24 12:01:21 +0530

वाई.　　　(रविंद्र मधुकरराव भेंडे)
दिनांक २०.०२.२०२५.　　　न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
वाई जिल्हा सातारा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

याद्वारे मी असे प्रतिपादन करते की, वरील न्यायनिर्णय व त्याची तयार केलेली पी.डी.एफ. प्रत यातील सर्व मजकूर मूळ न्यायनिर्णयाशी तंतोतंत बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | : | २०.०२.२०२५ |
| न्यायनिर्णय स्वाक्षांकित दिनांक | : | २०.०२.२०२५ |
| लघुलेखकाचे नाव | : | सौ. एस. एस. कुंभार<br>लघुलेखिका (श्रेणी ३) |
| न्यायानिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | | २४.०२.२०२५ |